क्र.पोमसं/३०/कोविड-१९/शा.नि./५४/२०२०. मुंबई, दिनांक -०८/११/२०२०

**विषय :-** कर्तव्य पार पाडत असतांना "कोविड-१९" या सांसर्गिक रोगाची लागण झाल्यामुळे मृत पावलेल्या पोलीस अधिकारी व अंमलदार यांच्या कुटुंबियांना, अशा पोलीस अधिकारी / अंमलदार यांना ते सेवेत असताना वाटप करण्यात आलेली सेवा निवासस्थाने ताब्यात ठेवण्यास परवानगी देण्याबाबत.

*****

**परिपत्रक**

शासन निर्णय, गृह विभाग, क्र.शानिवा-०५२०/प्र.क्र.१०३/पोल-७, दिनांक २६/१०/२०२० ची प्रत यासोबत पाठविण्यात येत आहे.

२. खालील घटक प्रमुखांनी सदर शासन निर्णयातील तरतुदींनुसार शासकीय निवासस्थान ताब्यात ठेवण्याबाबत आवश्यक ती कारवाई करावी.

( अनिल पां. सावंत )
पोलीस महासंचालक यांचे उप सहायक (लेखा) (अति.कार्य.)
पोलीस महासंचालक, म.राज्य,मुंबई यांचेकरिता.

प्रति,

महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, म.राज्य, मुंबई
आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, म.राज्य, मुंबई
अपर पोलीस महासंचालक, विशेष कृती, महाराष्ट्र राज्य, मुंबई
अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे
अपर पोलीस महासंचालक व संचालक, पोलीस बिनतारी संदेश, महाराष्ट्र राज्य, पुणे
अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, मुंबई / नागरी हक्क संरक्षण, मुंबई / लोहमार्ग, मुंबई / राज्य राखीव पोलीस बल, मुंबई / वाहतूक, मुंबई
सर्व पोलीस आयुक्त (लोहमार्गसह) (बृहन्मुंबई वगळून)
अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, म.राज्य, मुंबई / बिनतारी संदेश विभाग, पुणे / वाहतूक, मुंबई / लोहमार्ग, मुंबई / राज्य राखीव पोलीस बल, मुंबई / गुन्हे अन्वेषण विभाग, पुणे / दहशतवाद विरोधी पथक, म.राज्य, मुंबई.
संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक / महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी, पुणे.
सर्व पोलीस आयुक्त (लोहमार्ग सह) (बृहन्मुंबई वगळून)
सर्व परिक्षेत्रिय विशेष पोलीस महानिरीक्षक
विशेष पोलीस महानिरीक्षक, नक्षल विरोधी अभियान, नागपूर / विशेष सुरक्षा विभाग, दादर, मुंबई / फोर्स वन, मुंबई / नागरी हक्क संरक्षण, मुंबई / मोटार परिवहन, पुणे / राज्य राखीव पोलीस बल, नागपूर / पुणे
पोलीस उप महानिरीक्षक, गडचिरोली परिक्षेत्र, कॅम्प नागपूर
सर्व पोलीस अधीक्षक (जिल्हा / लोहमार्ग / बिनतारी संदेश, पश्चिम विभाग, पुणे / पूर्व विभाग, नागपूर / विशेष कृती दल)
सर्व समादेशक, राज्य राखीव पोलीस बल, गट क्र.१ ते १६ / राज्य आपत्ती प्रतिसाद दल, नागपूर / धुळे
सर्व प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण केंद्रे / अ.अ.प्र.कें., नागपूर

प्रत,

कार्यासन अधिकारी, कार्यासन क्र.१६, ३९ पोमसं कार्यालय.

(13)

कर्तव्य पार पाडत असताना "COVID-19" या सांसर्गिक रोगाची लागण झाल्यामुळे मृत पावलेल्या पोलीस अधिकारी व कर्मचारी यांच्या कुटुंबियांना, अशा पोलीस अधिकारी/ कर्मचारी यांना ते सेवेत असताना वाटप करण्यात आलेली सेवा निवासस्थाने ताब्यात ठेवण्यास परवानगी देण्याबाबत.

0620
27 OCT 2020
30 39
N- 4240/20

# महाराष्ट्र शासन

## गृह विभाग

शासन निर्णय क्र.शानिवा-०५२०/प्र.क्र.१०३/पोल-७.
मंत्रालय, दुसरा मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०००३२.
दिनांक २६ ऑक्टोबर २०२०.

वाचा :-

१) शासन निर्णय, गृह विभाग, क्र. आरएसए-०५११/प्र.क्र.२४२/पोल-७, दिनांक १७ जून २०११.

२) शासन निर्णय., गृह विभाग, क्र.शानिवा-०५२०/प्र.क्र.१०३/पोल-७, दिनांक ०६.०७.२०२०.

३) पोलीस महासंचालक, म.रा., यांच्या कार्यालयाचे पत्र क्र.पोमसं/३०/कोविड-१९/ शा.नि./ ५४/ २०२०, दिनांक २४.०७.२०२०.

08/11/2020

प्रस्तावना.

कर्तव्य पार पाडत असताना "COVID-19" या सांसर्गिक रोगाची लागण झाल्यामुळे मृत पावलेल्या, पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, यांच्या आस्थापनेवरील पोलीस अधिकारी/ कर्मचारी यांच्या कुटुंबियांना, संबंधित पोलीस अधिकारी/ कर्मचारी याच्या नियत वयमानाने सेवानिवृत्तीच्या तारखेपर्यंत सेवा निवासस्थान ताब्यात ठेवण्यास, शा.नि., गृह विभाग, दिनांक ०६.०७.२०२०, द्वारे परवानगी देण्यात आली आहे.

२. त्याच धर्तीवर पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांच्या अधिपत्याखालील इतर पोलीस आस्थापनांवरील पोलीस अधिकारी/ कर्मचारी यांच्या बाबतीतही परवानगी देण्याबाबत शासन आदेश व्हावेत, अशी विनंती पोलीस महासंचालक, म.रा., यांच्या कार्यालयाने केली आहे. त्यास अनुलक्षून शासनाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

शासन निर्णय.

कर्तव्य पार पाडत असताना “COVID-19” या सांसर्गिक रोगाची लागण झाल्यामुळे मृत पावलेल्या, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांच्या अधिपत्याखालील, पोलीस आयुक्तालय, बृहन्मुंबई, वगळता इतर पोलीस आस्थापनांवरील, पोलीस अधिकारी व कर्मचारी यांच्या कुटुंबियांनी, अशा पोलीस अधिकारी/ कर्मचारी यांना ते सेवेत असताना वाटप करण्यात आलेली सेवा निवासस्थाने त्यांच्या नियत वयमानाने सेवानिवृत्तीच्या तारखांपर्यंत, अनुज्ञाप्ती शुल्क भरुन ताब्यात ठेवण्यास, याद्वारे, परवानगी देण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

२८.१०.२०२०

(हरेश्वर सहाणे)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१) मा. राज्यपाल यांचे सचिव, राज भवन, मलबार हिल, मुंबई.
२) मा. मुख्य मंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मा. उप मुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
४) मा. गृह मंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५) मा. विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानसभा/ विधानपरिषद, यांचे खाजगी सचिव, विधान भवन, मुंबई.
६) मा. राज्यमंत्री, गृह (शहरे), यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
७) मा. राज्यमंत्री, गृह (ग्रामीण), यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
८) पोलीस महासंचालक, म.रा., मुंबई.

प्रत-

१) महासंचालक, माहिती व जनसंपर्क, म.रा., मुंबई.
२) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
३) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
४) प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/ लेखा परीक्षा)-१, महाराष्ट्र, मुंबई.
५) प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/ लेखा परीक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर.
६) निवड फाईल, पोल-७.